माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : २५६६/२०२४**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. हरिदास तानबाजी रानडे, वेदार्या होम बी-५०५, एनएच-४४, बोरखेडी(फाटक), बुटीबोरीद, ता. नागपूर(ग्रा.), जि. नागपूर-४४११०८ | सहा. प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, नागपूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १५.०६.२०२६**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित (प्रतिनिधी)** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०३.१०.२०२४

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३.१०.२०२४

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार आजपावेतो कोणतीही माहिती दिलेली नाही.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जोडपत्र-अ नुसार संपूर्ण माहिती देण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ७(१) नुसार दोषी आहेत. त्यामुळे त्यांचेवर कलम १९(८)(ग)व२०(१) नुसार जास्तीत जास्त शास्ती करण्यात यावी. तसेच माहिती मिळविण्याकरीता होत असलेल्या त्रासाबाबत कलम १९(८)(ख) नुसार नुकसान भरपाई मिळण्याबाबत आदेश करावेत.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २७.०६.२०२४

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २७.०६.२०२४

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि. ०१ एप्रिल, २०१९ ते अद्यावत

(४)जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : “ दि. ०१ एप्रिल, २०१९ ते अद्यावत शासनाकडून प्राप्त झालेले मुद्रांक शुल्क अनुदान ग्रामपंचायतला वितरीत करण्यात आले. वितरणा संबंधी संपूर्ण

विवरणपत्रक तथा मुद्रांक शुल्क अनुदानामधून करण्यात आलेला खर्च विवरण" असे नमूद करुन माहिती मागितलेली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०८.०८.२०२४

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०८.०८.२०२४

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : अद्याप माहिती अप्राप्त आहे.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १२.०९.२०२४ रोजी सुनावणी घेवून " अपिलार्थी, श्री. हरिदास तानबाजी रानडे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांचेकडे सादर केलेल्या माहिती अधिकारातील अर्जाचे अनुषंगाने श्री. रविंद्र परतेकी, विस्तार अधिकारी (पंचा) यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली मुद्रांक शुल्काची माहिती १० दिवसाचे आत न चुकता उपलब्ध करुन द्यावी" असे नमूद करुन अपील अर्ज निकाली काढण्यात आले.

५. **युक्तीवाद/लेखी खुलासा** – आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलकर्ता उपस्थित असून त्यांनी आयोगासमक्ष कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार दिनांक २७.०९.२०२४ रोजी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

त्यावर उपस्थित जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती नागपूर, श्री. संजय धोटे यांनी स्पष्ट केले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही पंचायत विभागाशी संबंधीत असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याबाबत सहाय्य मागविण्यात आले होते. परंतु त्यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतीही माहिती पुरविता आली नाही. तथापि, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.०९.२०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थीस दिनांक २७.०९.२०२४ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

६. **निष्कर्ष :–** अपिलार्थी, श्री. हरिदास तानबाजी रानडे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांच्याकडे दिनांक २७.०६.२०२४ रोजी माहितीसाठी अर्ज केला होता. त्यांच्या या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार दिनांक २७.०९.२०२४ रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच अपिलकर्ता यांनी जोडपत्र-अ नुसार दिनांक १ एप्रिल, २०१९ ते अद्यावत या कालावधीतील मुद्रांक शुल्क ग्रामपंचायतला वितरणासंबंधी संपूर्ण विवरणपत्रक तथा मुद्रांक शुल्क अनुदानामधून करण्यात आलेला खर्च विवरण यासंबंधाने एकूण २६ पानांची माहिती मिळाली असल्याची पोच पावती आयोगासमक्ष सादर केलेली आहे.

ही बाब लक्षात घेता, सदर प्रकरणी अपिलकर्ता यांना माहिती प्राप्त झाली असल्याने प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढणे क्रमप्राप्त ठरत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १५.०६.२०२६**

जावक क्रमांक ५६८०६ दिनांक - 2 JUL 2026

K-2025/2566/2024/रानडे